वांग मध्यम प्रकल्प, ता. पाटण, जि. सातारा- चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांक :- सुप्रमा-२०१५/५६४/(प्र.क्र. ३७१/१५)/म.प्र.
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १० नोव्हेंबर, २०१७.

<u>संदर्भ</u>:-१) शासन निर्णय क्र. डब्ल्यूएनजी १०८५/३४/(१२०/८५)/जसंअ, दि. ३१/१०/१९९५
२) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ,पुणे मकृखोविमं/निर्णय क्र. मप्र-६/२०२/(२६६/२००२)/७८५३, दि. १०/१०/२००२.
३) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ,पुणे मकृखोविमं/निर्णय क्र. मप्र-३/(३९३/२००४)/३६२६, दि. ०५/०५/२००५.
४) शासन निर्णय क्र. वांग-सुप्रमा/२००८/(२११/०८)/मध्यम प्रकल्प, दि. २३/०३/२००९.
५) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ,पुणे यांचे पत्र क्र.मकृखोविम/०२११/(८/११८८/२०११)प्रशा-५/५९८२, दि.१०/०९/२०१५.

<u>प्रस्तावना</u>:-

वांग मध्यम प्रकल्प हा महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत वांग नदीवर मौजे मराठवाडी या गावाजवळ १२०० मीटर लांबीचे माती धरण व ५५.५० मीटर लांबीचा ओगी पद्धतीचा सांडवा बांधण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पांतर्गत कालवे नसून को.प. बंधा-यातून उपसा सिंचनाद्वारे ६२०० हेक्टर सिंचनाखाली (I.C.A.) आणण्याचे प्रस्तावित आहे. धरणप्रकल्पाचे खालील बाजुस एकूण १० को.प. बंधा-याची साखळी आहे. १) मालदन २) साईकडे ३) काढणे ४) कोळे ५) आणे ६) मानेवाडी हे ६ को.प. बंधारे ल.पा. विभागामार्फ़त बांधकाम पूर्ण केलेले आहेत. उर्वरित १) मराठवाडी २) भोसगांव ३) खळे ४) पोतले हे ४ को.प. बंधारे बांधवयाचे असून या को.प.बंधा-यांचा समावेश या सुधारित प्रकल्प अहवालात प्रस्तावित आहे.

सदर प्रकल्पात एकूण ७७.२९ द.ल.घ.मी. पाणीसाठ्याची निर्मीती करण्यात येणार आहे. प्रकल्पाच्या एकूण ७७.२९ द.ल.घ.मी (२.७३ अ.घ.फ़ू.) पाणी वापरापैकी ३८.२२ द.ल.घ.मी. (१.३५ अ.घ.फ़ू.) पाणी सिंचनासाठी, ७.०७ द.ल.घ.मी. (०.२५ अ.घ.फ़ू.) पाणी पिण्याच्या पाणी पुरवठ्यासाठी, २७.४७ द.ल.घ.मी. (०.९७ अ.घ.फ़ू.) पाणी टेंभू प्रकल्पासाठी व बाष्पीभवन व्यय ४.५३ द.ल.घ.मी. (०.१६ अ.घ.फ़ू.) असा होणार आहे. को.प. बंधा-याद्वारे साखळीने वांग नदीचे दोन्ही तिरावरील नदीपात्रातुन ५० मीटर (१६४ फ़ुट) उंचीपर्यंतचे लाभक्षेत्र उपसा सिंचन पद्धतीने सिंचीत करण्याचे अंतर्भूत असून ६२०० हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे.

वांग मध्यम प्रकल्पास संदर्भ क्र. १ नुसार सन १९९३-९४ चे दरसूचीवर आधारीत रू. ८१.४६ कोटी (रूपये एक्याशी कोटी छेचाळीस लक्ष फक्त) इतक्या रकमेस मुळ प्रशासकीय मान्यता, संदर्भ क्र.२ नुसार सन १९९९-२००० चे दरसूचीवर आधारीत रू. २०९.११ कोटी (रूपये दोनशे नऊ कोटी अकरा लक्ष फक्त) इतक्या रकमेस प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता, संदर्भ क्र. ३ नुसार सन

२००३-०४ चे दरसूचीवर आधारीत रू. २२७.९७ कोटी (रूपये दोनशे सत्ताविस कोटी सत्यांन्नव लक्ष फक्त) इतक्या रकमेस द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता, संदर्भ क्र. ४ नुसार सन २००५-०६ चे दरसूचीवर आधारीत रू. २३५.९१ कोटी (रूपये दोनशे पस्तीस कोटी एक्यांन्नव लक्ष फक्त) इतक्या रकमेस तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांचे संदर्भ क्र.५ अन्वये सन २०११-१२ चे दरसूचीवर आधारीत रु. ३०४.०५ कोटी किंमतीचा चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव मान्यतेस्तव शासनास सादर केला आहे. प्रकल्पाचे लाभ व्यय गुणोत्तर १.३६ येत असून प्रकल्प आर्थिक मापदंडात बसत नाही.

सदर प्रकल्पाचा तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता किंमत रु. २३५.९१ कोटी च्या तुलनेत चतुर्थ सुधारित प्रकल्प अहवालाची किंमत रु. ६८.१३ कोटीने जास्त आहे. किंमत वाढीची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत :-

अ.क्र.	**बाब**	**वाढ (रुपये कोटी)**
१	**२**	**३**
१	दरसूचीतील वाढीमुळे झालेली वाढ	४१.३२
२	भूसंपादनाच्या दरातील वाढ	१.१८
३	जास्त दराची निविदा स्विकृतीमुळे वाढ	०.४९
४	इतर कारणामुळे झालेली वाढ	१२.४५
५	अनुषंगिक कामे	१२.६९
	एकुण वाढ	**६८.१३**

प्रकल्पाचा संकल्पीत पाणीसाठा ७७.२९ द.ल.घ.मी. असून सातारा जिल्ह्यातील पाटण व कराड तालुक्यातील एकूण ६२०० हे. क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. सदर प्रकल्प प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजने अंतर्गत समाविष्ट आहे. त्यामुळे नियोजनानुसार प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने या प्रकल्पाच्या चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावास मान्यता देणेचा शासनाचे विचाराधीन होता.

नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने सदर प्रस्ताव दि. ०७/०९/२०१७ रोजी व्यय अग्रक्रम समितीच्या पुढे विचारार्थ ठेवला असता व्यय अग्रक्रम समितीने प्रस्तावास काही अटींच्या अधिन राहून मान्यता दिली.

<u>शासन निर्णय</u> :-

शासन आता या निर्णयाव्दारे कृष्णा खोऱ्यातील वांग प्रकल्पाच्या सन २०११-१२ च्या दरसूचीवर आधारीत रु.३०४.०५ कोटी (रूपये तिनशे चार कोटी पाच लक्ष फक्त) इतक्या किंमतीच्या

चतुर्थ सुधारीत प्रकल्प अहवालास प्रशा़सकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्यापैकी रु. २५९.१५ कोटी (रुपये दोनशे एकोणसाठ कोटी पंदरा लक्ष फक्त) कामाप्रित्यर्थ व रु. ४४.९० कोटी (रुपये चौरेचाळीस कोटी नव्वद लक्ष फक्त) अनुषंगिक खर्चासाठी तरतूद आहे. सोबत उपशिर्ष निहाय तरतुदींचा गोषवारा दिलेला आहे.

२. या योजनेस प्रदान केलेली चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता मध्यम प्रकल्प कार्यासनाच्या नोंदवहीमध्ये अनुक्रमांक ०२/ २०१७ वर नोंदवण्यात आली आहे.

३. सदर प्रकल्पाचे उर्वरित काम नियोजित वेळेत व सुधारित प्रशासकीय मान्यता तरतूदीच्या मर्यादेत पूर्ण करण्यात यावे.

४. या योजनेच्या कामावर होणारा खर्च मागणी क्रमांक- आय-५, ४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे यावरील भांडवली खर्च, ८०-सर्वसाधारण, १९०-सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूका (०२) योजनांतर्गत,(०२)(०१) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास या महामंडळास भाग भांडवली अंशदान (४७०१ एच६२९) या लेखाशिर्षाखाली खर्च टाकावा व त्याखालील मंजुर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. सदर चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

५.१) सदर सुधारित प्रशासकीय मान्यता म्हणजे प्रकल्प कार्यान्वयी करण्याच्या विविध टप्यावर झालेल्या अनियमिततेस मान्यता गृहित धरता येणार नाही.

५.२) या प्रकल्पाबाबत चालू असलेल्या अथवा प्रस्तावित विभागीय चौकशीची कार्यवाही पूढे चालू ठेवावी. चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याच्या निर्णयामुळे विभागीय चौकशीच्या कार्यवाहीस कोणतीही बाधा पोहचणार नाही

५.३) व्यय अग्रक्रम समितीने दिलेल्या मान्यते नुसार सदर प्रकल्पाचे लाभव्यय गुणोत्तर १.३६ असे असले तरी सदर प्रकल्प प्रधान मंत्री कृषी सिंचाई योजने मधील असल्याने सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

५.४) आर्थिक दायित्व निर्माण होईल अशा नवीन घटकांचा शासन मान्यतेशिवाय प्रकल्पात समावेश करण्यात येऊ नये.

५.५) प्रगतीपथावरील निविदांची कामे प्राधान्याने पूर्ण करण्यात यावीत. पाणीसाठ्याचा सिंचनाकरिता जास्तीत जास्त लाभ होईल अशा प्रकारे उर्वरित कामांचा प्राधान्यक्रम निश्चित करण्यात यावा व त्यानुसार कामे/निविदा प्रक्रिया करण्यात यावी.

५.६) सदर प्रकल्पासाठी कोणत्याही प्रयोजनार्थ मंजूर चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेबाहेर जाऊन, निधी वितरण अथवा अतिरिक्त खर्च करता येणार नाही. या संदर्भात प्रचलित शासन निर्णय, CWC ची मार्गदर्शक तत्वे, वित्त अधिकार मर्यादा, विहित केलेली निविदा कार्यपद्धती याची काटेकोरपणे अंबलबजावणी करण्यात यावी.

५.७) प्रकल्पाचे काम नियोजना नुसार सन २०१९-२० मध्ये पूर्ण करण्यात यावे.

६. सदर शासन निर्णय, नियोजन विभाग, अनौपचारीक संदर्भ क्र.११७/का.१४३४ दि. १९/०५/२०१७, वित्त विभागाचे अनौपचारीक संदर्भ क्र. १३२/२०१७/व्यय-१२, दि.०३/०७/२०१७ व दि.०७/०९/२०१७ रोजी झालेल्या व्यय अग्रक्रम समितीच्या बैठकीतील निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी निर्गमित दिनांकापासून करण्यात यावी.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१७१११०१६१६३५२८२७ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dharane Mallikarjun Irappa

Digitally signed by Dharane Mallikarjun Irappa
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=42153c779eba7d6ca17364b6d37857b105b20a01d36c767c7ed1d7d278837bd7, cn=Dharane Mallikarjun Irappa
Date: 2017.11.10 16:04:55 +05'30'

सहपत्र :- उपशीर्षनिहाय तरतुदींचा गोषवारा

(म. ई. धरणे)
शासनाचे उप सचिव

प्रत, सहपत्रांसह :-

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.मंत्री (जलसंपदा) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
४) मा.राज्यमंत्री (जलसंपदा) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
५) मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक,मंत्रालय, मुंबई
६) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
७) अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
८) प्रधान सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
९) सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१०) सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
११) महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/ नागपूर.
१२) कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे.
१३) मुख्य अभियंता (द.व प्र) व सहसचिव यांचे स्वीय सहाय्यक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) मुख्य अभियंता, (वि.प्र.),जलसंपदा विभाग, पुणे.
१५) उपसचिव (मो.प्र-१/ मो.प्र-२/जसं/निवसं/सिंव्य/लाक्षेवि/लपा/जवि),यांचे स्वीय सहाय्यक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.

१६) आंतरवित्त सल्लागार व उपसचिव यांचे स्वीय सहाय्यक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७) अधीक्षक अभियंता, सातारा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, सातारा.
१८) कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, सातारा.
१९) वित्त विभाग (व्यय-१२/ अर्थ-०२/अर्थ-१०/व्यय-६ अ), मंत्रालय, मुंबई.
२०) नियोजन विभाग (कार्यासन १४३४), मंत्रालय, मुंबई.
२१) मध्यम प्रकल्प कार्यासन संग्रहार्थ.

उपशीर्ष निहाय तरतुदींचा गोषवारा
वांग मध्यम प्रकल्प, ता. पाटण, जि.सातारा
शासन निर्णय क्र. सुप्रमा-२०१५/५६४/(प्र.क्र.३७१/१५)/म.प्र., दि. १०/११/२०१७ चे सहपत्र.

अ.क्र.	उपशीर्ष	चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता अंदाजपत्रक (रुपये कोटी)
१.	२.	३.
१)	अ-प्राथमिक	०.५६६
२)	ब-भूसंपादन	८३.९५
३)	सी-कामे	१३७.३७
४)	डी-रेग्युलेटर	३४.७९
५)	जी-पुल	०.००
६)	के-इमारती	०.५३
७)	एम- लागवाड	०.०९९
८)	ओ- संकिर्ण	०.७८
९)	पी- देखभाल	०.५७
१०)	क्यु हत्यारे व संयत्रे	०.१४
११)	आर-दळणवळण	०.३६
	एकूण कामाप्रित्यर्थ	**२५९.१५**
	अनुषंगिक खर्च	**४४.९०**
	एकूण	**३०४.०५**